महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

जा.क्र.पुविमं / आ1 - आ2 / 7520
दिनांक 11 / 09 / 2025

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) फेब्रु-मार्च २०२६ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट(अर्ज क्रं.१७ अन्वये) होणा-या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- १) राज्य मंडळ /परीक्षा.३/२६९७ दिनांक ३०/०७/२०२५ चे पत्र व प्रकटन
२)राज्य मंडळ /परीक्षा.३/३०३३ दिनांक ३०/०८/२०२५ चे पत्र व प्रकटन

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मंडळामार्फत फेब्रु-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस खाजगीरित्या (अर्ज क्रं.१७ अन्वये) प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रक्रियेस मुदतदवाढीबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर पत्राची नोंद घेवून उचित कार्यवाही करण्यात यावी.

तसेच विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर तो आपल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयात सर्व कागदपत्रासह जमा करून ऑनलाईनरित्या या मंडळास पाठविण्यात यावेत. तरी कोणताही विद्यार्थ्याचा खाजगी नावनोंदणी अर्ज नाकारण्यात येवू नये, तसे आढळून आल्यास मंडळ नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सोबत :- संदर्भिय दि. ३०/०८/२०२५ चे प्रकटन

Digitally signed by
Kailas Ganpatrao Datkhil
Date: 11-09-2025
12:30:47
(कैलास दातखीळ)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

letter 49

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

खाजगी विद्यार्थी (Private Candidate) नावनोंदणी अर्ज

• प्रकटन •

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इ. १०वी व इ. १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

१. फेब्रु-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) नियमित शुल्कासह ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा( मुदतवाढ) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे. | सोमवार दि. ०१/०९/२०२५ ते सोमवार दि. १५/०९/२०२५ |

२. खाजगी विद्यार्थ्यांना इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.या संदर्भात अधिक माहितीसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता १)शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.**

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

दिनांक – २१ /०८/२०२५
30

PDF Scanner ACE Scanner